# प्रेसनोट दिं.२७/०६/२०१९

## दत्तवाडी पो.स्टे.पणे शहर

**<u>दत्तवाडी पोलीसांनी बेकायदेशीर हस्तीदंत विक्री करणाऱ्या चौघांना केले अटक</u>**

दि.२६/०६/२०१९ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांना त्यांच्या गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की पु.ल.देशपांडे गार्डन सिंहगड रोड पुणे येथे बसस्टॉप जवळ चार इसम हस्तीदंत विक्री करण्यासाठी येणार आहेत त्या नुसार त्यांनी बातमीची पुर्ण शहानिशा करुन तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक कुलदिप संकपाळ, पोहवा रविंद्र फुलपगारे, सुधीर घोटकुले, पोना सोमेश्वर यादव, महेश गाढवे, पोलीस कॉन्स्टेबल अक्षय वाबळे, शरद राऊत, अमोल लोहार, सागर सुतकर यांची कारवाई करण्या करीता टिम तयार केली. वन विभागाला त्या बाबत माहिती दिली. त्यानंतर तयार केलेल्या पथकाने वन विभागाच्या अधिकारी व पंचासोबत पु.ल.देशपांडे गार्डन परिसरात साध्या वेशात वेगवेगळया व्यावसायीकांचे वेशांतर करुन कोणालाही ते पोलीस असल्याचे संशय येणार नाही असा सापळा रचला. काही वेळाने बातमीदाराने सांगितल्या प्रमाणे चार इसम त्या ठिकाणी आले त्यापैकी एका इसमाच्या पाठीवर काळया रंगाची सॅक होती. त्या इसमाकडे संशयीत हस्तीदंत असल्याचे खबऱ्याने सांगताच वरील चारही इसमांना पळुन जाण्याची संधी न देता अलगद पोलीस पथकाने ताब्यात घेतले व पंच व वन विभागाचे अधिकारी यांचे समक्ष त्या इसमाच्या पाठीवर असणारी सॅक तपासली असता त्यामध्ये दोन हस्तीदंत मिळुन आले त्या दोन हस्तीदंताची लांबी प्रत्येकी अंदाजे सव्वा फुट व वजन सुमारे एक किलो असल्याचे समजले.वरील हस्तीदंत बाळगण्या बाबत त्यांच्याकडे काही वन विभागाचा परवाना आहे का याची विचारणा करता त्यांच्याकडे कोणत्याही स्वरुपाचा परवाना नसल्याचे समजले.

इसम नामे १) आदित्य संदिप खांडगे,वय १९ वर्षे, रा. काळे पेट्रोल पंपाशेजारी, देहु फाटा, आळंदी, पुणे, २)ऋषिकेश हरिशचंद्र गायकवाड,वय २८ वर्षे, रा.सुखकर्ता कॉलनी, स्वामी विवेकानंद नगर, वाकड पुणे, ३)अनिकेत चंद्रकांत अष्टेकर,वय २६ वर्षे, रा.प्लॉट नंबर ४४१, भावना ऋषी सोसायटी, नगर कल्याण रोड, अहमदनगर, ४) अमित अशोक पिस्का,वय २८ वर्षे, रा.घर नं.४४१६, जुना मंगळवार बाजार, सामलवाडा, अहमदनगर या चार इसमांनी बेकायदेशीररित्या हस्तिदंत विक्री करीता आणले असल्याचे लक्षात आल्याने त्यांच्या विरुद्ध दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे वन्य प्राणी संरक्षण कायदा १९७२ कलम ९,४४,४९(ब),५२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक कुलदिप संकपाळ हे तपास करत आहेत.

वरील कारवाई मा.श्रीकांत तरवडे, अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे, मा.मंगेश शिंदे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ पुणे, मा.सुधाकर यादव, सहाय्यक पोलीस आयुक्त, सिंहगड रोड विभाग, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली देविदास घेवारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे, पोलीस उप निरीक्षक कुलदिप संकपाळ, पोहवा. रविंद्र फुलपगारे, सुधीर घोटकुले, श्रीकांत शिरोळे, सोमेश्वर यादव, महेश गाढवे, कुणाल माने,रोहन खैरे अक्षय वाबळे,शरद राऊत, सागर सुतकर, अमोल लोहार, महेश गिरी, यांनी केली.